IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# जागतिकीकरणाच्या युगात मराठी साहित्याचा प्रसार.

**कु. शैलजा सदाशिव कांबळे.**
मराठी विभाग, एम. ए. भाग- १,
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली. (स्वायत्त) ४१६४१६, महाराष्ट्र, भारत.
kambleshailaja77@gmail.com

**सारांश** (Abstract) *: जागतिकीकरणाच्या युगात डिजिटल तंत्रज्ञान सोशल मीडिया आणि ई-बुक्समुळे मराठी साहित्य जागतिक स्तरावर पोहोचले आहे. सीमा ओलांडून साहित्याचा प्रसार, भाषांतराद्वारे नवीन वाचक वर्ग आणि जागतिक विषयांवरील मांडणी हे या काळाचे वैशिष्ट्य आहे. तरीही भाषिक अस्मिता टिकवणे आणि गुणवत्ता पूर्ण अनुवादाची आव्हाने कायम आहेत.*
*मराठी साहित्याचे जागतिक व्यासपीठ म्हणून 'विश्व मराठी साहित्य संमेलन' हे सर्वात प्रमुख मानले जाते. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा जगभरात प्रसार करणे हे या व्यासपीठाचे मुख्य उद्दिष्ट आहे.*
*जागतिकीकरणाच्या युगात मराठी साहित्याचा प्रसार आणि त्यास जागतिक व्यासपीठ मिळवून देणे ही काळाची गरज बनली आहे. आज मराठी साहित्याने केवळ प्रादेशिक सीमा ओलांडल्या नसून, जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे.*

**की - वर्ड** : मराठी साहित्य, जागतिकीकरण, साहित्य प्रसार, आंतरराष्ट्रीय व्यासपीठ, महानगरीय साहित्य, आधुनिकतावाद, अनुवाद अभ्यास, डायस्पोरा लेखन.

## I. प्रस्तावना

जागतिकीकरण ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया मानली जाते. विज्ञान, तंत्रज्ञान, दळणवळण, व्यवस्था, इंटरनेट आणि प्रसारमाध्यमांच्या झपाट्याने झालेल्या विकासामुळे संपूर्ण जग एका जागतिक गावात रूपांतरीत झाले आहे. विविध देशांतील भाषा संस्कृती कला आणि साहित्य यांची देवाण-घेवाण मोठ्या प्रमाणात वाढली आहे. साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब असल्यामुळे जागतिकीकरणाचा प्रभाव साहित्यावरही स्पष्टपणे दिसून येतो. मराठी साहित्यानेही या बदलत्या काळाशी जुळवून घेत जागतिक स्तरावर आपले वेगळे स्थान निर्माण करण्यास सुरुवात केली आहे.
पूर्वी मराठी साहित्याचा प्रसार मुख्यता महाराष्ट्रापुरता मर्यादित होता; परंतु आज इंटरनेट, अनुवाद, डिजिटल प्रकाशन आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्या सहाय्याने मराठी साहित्य जगभर पोहोचत आहे. परदेशातील मराठी मंडळी जागतिक मराठी साहित्य संमेलने आणि विविध डिजिटल माध्यमे यांमुळे मराठी साहित्याला जागतिक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

## II. मराठी साहित्याची समृद्ध परंपरा

मराठी साहित्याला हजारो वर्षांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. संत ज्ञानेश्वरांनी ' भावार्थदीपिका' अर्थात ' ज्ञानेश्वरी' च्या माध्यमातुन मराठी भाषेला अभिजात स्वरूप प्राप्त करून दिले. संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांनी भक्ती, समाज प्रबोधन आणि मानवतावादाचा संदेश आपल्या अभंगांमधून दिला. पुढे लोकहितवादी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर यांनी सामाजिक सुधारण्याचे विचार साहित्याच्या माध्यमातून मांडले.
आधुनिक काळात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, विजय तेंडुलकर, शिवाजी सावंत, भालचंद्र नेमाडे, शरणकुमार लिंबाळे, लक्ष्मण माने यांसारख्या साहित्यिकांनी मराठी साहित्य अधिक व्यापक केले. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य अशा विविध प्रवाहमुळे मराठी साहित्य अधिक समृद्ध जीवनाभिमुख बनले आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

III. जागतिक व्यासपीठावर मराठी साहित्य : प्रसार आणि साधने

| क्र. | माध्यम / साधन | साहित्यातील योगदान / भूमिका |
|---|---|---|
| १ | डिजिटल क्रांती (Internet) | मायाजाल' Internet मुळे मराठी साहित्याची जगभरात उपलब्धता. ब्लॉग, ई - पुस्तके आणि साहित्य विषयक संकेतस्थळे. |
| २ | सोशल मीडिया | फेसबुक, व्हॉट्सॲप, यूट्यूब आणि इंस्टाग्रामच्या माध्यमातून ललित आणि वैचारिक साहित्याचे वेगाने प्रसार. |
| ३ | अनुवाद प्रक्रिया (Translation) | भालचंद्र नेमाडे, विजय तेंडुलकर, शांताराम गोखले आणि विलास सारंग यांच्यासारख्या लेखकांचे साहित्य जागतिक भाषांमध्ये अनुवादित झाल्यामुळे मराठी जाणिवांना आंतरराष्ट्रीय ओळख मिळाली. "The Greatest Marathi Stories Ever Told" सारख्या संकलनामुळे जागतिक वाचकांना मराठी साहित्याची ओळख निर्माण झाली आहे. |
| ४ | अनिवासी भारतीयांचे योगदान ( Diaspora) | अमेरिका, ब्रिटन आणि आखाती देशांमधील मराठी समूहांनी "जागतिक मराठी संमेलने" आणि स्थानिक साहित्याद्वारे मराठी संस्कृतीचे जागतिक संवर्धन केले आहे. |
| ५ | जागतिक मराठी परिषद आणि संमेलने | परदेशात होणारी मराठी संमेलने ज्यामुळे जागतिक वाचक वर्ग एकत्र येत आहे. |

IV. जागतिकीकरणाचा मराठी साहित्यावर प्रभाव

१. **नवीन विषय** :- स्थलांतर, महानगरीय जीवन, डिजिटल संस्कृती आणि मानवी संबंधांमधील गुंतागुंत
२. **अनुवाद** :- मराठीतील दर्जेदार साहित्य (दलित साहित्य, ग्रामीण साहित्य) इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये अनुवादित होऊन जागतिक वाचकांपर्यंत पोहोचत आहे.
३. **नवे प्रवाह** :- मराठी कादंबरी, कथा आणि कवितेत पाश्चात्य तंत्रांचा स्वीकार.
४. **विषय आणि आशयातील बदल** :- जागतिकीकरणामुळे महानगरीय जीवन, स्थलांतर, आयटी संस्कृती आणि बदलत्या मानवी संबंधांचे चित्रण मराठी साहित्यात (विशेषतः कविता आणि कादंबरीमध्ये) प्रकर्षाने उमटू लागले.
५. **बोलीभाषा आणि अस्तित्व** :- एकीकडे इंग्रजीचा प्रभाव वाढत असताना, दुसरीकडे स्वतःच्या मुळांचा शोध घेण्यासाठी ग्रामीण आणि आदिवासी साहित्याने जागतिकीकरणाला एक प्रकारचे 'प्रति- उत्तर' दिले आहे.

V. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या संधी (OPPORTUNITIES) :-

जागतिकीकरणामुळे मराठी साहित्याला अनेक नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत.

**१) अनुवादाच्या माध्यमातून प्रसार:**

मराठी साहित्याच्या जागतिक प्रसारामध्ये अनुवादाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मराठीतील अनेक उत्कृष्ट साहित्यकृतींचे इंग्रजी, हिंदी, तसेच इतर परदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. त्यामुळे मराठी साहित्य जागतिक वाचकांपर्यंत पोहोचले आहे.

उदाहरणार्थ -

- विजय तेंडुलकर यांच्या नाटकांचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले असून त्यांचे प्रयोग परदेशातही सादर झाले.
- शिवाजी सावंत यांच्या मृत्युंजय या कादंबरीचे विविध भारतीय भाषांमध्ये अनुवाद झाले.
- दलित साहित्याचे इंग्रजी अनुवाद झाल्यामुळे जागतिक स्तरावर मराठी दलित साहित्याची दखल घेतली गेली.
- शरणकुमार लिंबाळे यांच्या ' अक्करमाशी' या आत्मकथनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी मिळाली.

अनुवादामुळे मराठी साहित्याची वैचारिक समृद्धी आणि सामाजिक वास्तव जगासमोर आले आहे.

**२) डिजिटल माध्यमांचा प्रभाव :**

आजच्या डिजिटल युगात इंटरनेट हे साहित्य प्रसाराचे प्रभावी साधन ठरले आहे. ई- पुस्तके, ऑडिओबुक्स, ब्लॉग्स, पॉडकास्ट आणि सोशल मीडियामुळे मराठी साहित्य सहज उपलब्ध झाले आहे.

आज अनेक संकेतस्थळे आणि मोबाईल ॲप्सवर मराठी साहित्य वाचता येते. युट्युब वर मराठी कवितावाचन, कथाकथन, साहित्य चर्चा आणि लेखकांच्या मुलाखती मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हाट्सअप सारख्या माध्यमांमुळे मराठी कविता आणि लेखन वेगाने प्रसारित होत आहे.

डिजिटल माध्यमांमुळे परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांनाही मराठी साहित्याची सातत्याने जोडून ठेवणे शक्य झाले आहे.

**३) जागतिक मराठी साहित्य संमेलने**

जगभरातील मराठी भाषिकांना एकत्र आणण्यासाठी विविध आंतरराष्ट्रीय मराठी साहित्य संमेलने आयोजित केली जातात. अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, दुबई आणि ऑस्ट्रेलिया येथे मराठी साहित्य विषयक कार्यक्रम, काव्यसंमेलने आणि चर्चासत्रे आयोजित होतात.

➢ **या संमेलनामुळे -**

- मराठी लेखकांना जागतिक व्यासपीठ मिळते.
- परदेशातील नवोदित लेखकांना प्रेरणा मिळते.
- मराठी भाषा आणि संस्कृती जपण्यास मदत होते.
- जागतिक स्तरावर मराठी साहित्याची ओळख निर्माण होते.

➢ **मराठी साहित्याचे जागतिक व्यासपीठ :-**

- अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन
- विश्व मराठी संमेलन
- शासकीय उपक्रम
- जागतिक दर्जाचे साहित्यिक

## VI. मराठी साहित्याचे विविध प्रवाह आणि जागतिक दखल

➢ **दलित साहित्य : -**

मराठी दलित साहित्य आणि जागतिक साहित्य विश्वात वेगळी ओळख निर्माण केली आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव असलेल्या या साहित्य प्रवाहने सामाजिक विषमता आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. या साहित्याची वास्तववादी शैली आणि मानवी वेदनांचे चित्र जागतिक वाचकांना भावले.

➢ **स्त्रीवादी साहित्य :-**

मराठी स्त्रीवादी साहित्य आणि महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडली. महिला स्वातंत्र्य, समानता आणि सामाजिक अन्याय या विषयावर आधारित साहित्य जागतिक स्तरावर चर्चिले जाऊ लागले.

➢ **ग्रामीण साहित्य :-**

ग्रामीण जीवन, शेतकरी समस्या, निसर्ग आणि लोकसंस्कृती यांचे वास्तववादी चित्रण करणाऱ्या ग्रामीण साहित्यालाही जागतिक स्तरावर महत्त्व प्राप्त झाले आहे.

## VII. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेली आव्हाने (CHALLENGES)

जागतिकीकरणामुळे संधी निर्माण झाल्या असल्या तरी काही समस्या देखील निर्माण झाल्या आहेत.

**१) इंग्रजीचे वाढते वर्चस्व**

इंग्रजी भाषेच्या प्रभावामुळे प्रादेशिक भाषांकडे दुर्लक्ष होत आहे. तरुण पिढीचा कल इंग्रजी साहित्याकडे वाढत असल्यामुळे मराठी वाचन संस्कृती कमी होत आहे.

**२) दर्जेदार अनुभवांचा अभाव**

अनेक उत्कृष्ट मराठी साहित्यकृती अजूनही इतर भाषांमध्ये अनुवादित झालेल्या नाहीत काही अनुवादांमध्ये मूळ साहित्याचा भावार्थ हरवतो.

**३) डिजिटल दरी**

ग्रामीण भागातील साहित्यिकांकडे आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा कमी असल्यामुळे त्यांचे साहित्य जागतिक स्तरावर पोहोचण्यास अडचणी निर्माण होतात.

**४) वाचनसंस्कृतीतील घट**

मोबाईल, मनोरंजन माध्यमे आणि सोशल मीडियामुळे पुस्तक वाचनाची सवय कमी होत चालली आहे. ही स्थिती साहित्याच्या विकासासाठी धोकादायक ठरू शकते.

**उपाययोजना :-**

मराठी साहित्याचा जागतिक स्तरावर अधिक प्रभावी प्रसार करण्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरतील -

१) मराठी साहित्याचे अधिकाधिक भाषांमध्ये दर्जेदार अनुवाद करणे.
२) डिजिटल प्लॅटफॉर्मवर मराठी साहित्य उपलब्ध करून देणे.
३) नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणे.
४) शाळा आणि महाविद्यालयांमध्ये वाचनसंस्कृती वाढवणे.
५) आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनांमध्ये मराठी साहित्याचा सहभाग वाढवणे.
६) ई-पुस्तके आणि ऑडिओबुक्सच्या निर्मितीला चालना देणे.

## VIII. निष्कर्ष (CONCLUSION)

जागतिकीकरणाच्या युगात मराठी साहित्याला व्यापक आणि प्रभावी व्यासपीठ प्राप्त झाले आहे. मराठी साहित्याची समृद्ध परंपरा, सामाजिक जाणीव, वास्तववादी दृष्टिकोन आणि मानवी मूल्ये यामुळे त्याला जागतिक साहित्य विश्वास महत्त्वाचे स्थान मिळू शकते. अनुवाद, डिजिटल माध्यमे, सामाजिक माध्यमे आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्या सहाय्याने मराठी साहित्याचा प्रसार अधिक वेगाने होत आहे.

तथापि, इंग्रजीचे वर्चस्व, वाचन संस्कृतीतील घट आणि अनुवादांचा अभाव ही आव्हाने दूर करणे आवश्यक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आणि नव्या पिढीला मराठी साहित्याशी जोडून ठेवून मराठी साहित्याचा जागतिक प्रवास अधिक समृद्ध आणि यशस्वी करता येईल. मराठी साहित्य हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित न राहता जागतिक मानवतेच्या अनुभवांना व्यक्त करणारे प्रभावी साहित्य म्हणून उदयास येत आहे.

IX. महत्त्वाचे शब्द (KEYWORDS)
मराठी साहित्य, जागतिकीकरण, साहित्य प्रसार, आंतरराष्ट्रीय व्यासपीठ, महानगरीय साहित्य, आधुनिकतावाद, अनुवाद अभ्यास, डायस्पोरा लेखन.